# प्रसिध्दी निवेदन

## राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा NTS (राज्यस्तर) इ. १० वी साठी

### राज्यस्तर परीक्षा दिनांक ०४ नोव्हेंबर २०१८ ची निवडयादी व गुणयादीबाबत

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत ०४ नोव्हेंबर २०१८ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. १० वी साठी राज्यस्तर परीक्षेची **निवड यादी व शाळानिहाय गुणयादी शुक्रवार दिनांक ०१/०३/२०१९ रोजी सायं. ५.०० वाजता** जाहीर होणार आहे.

**NTS** इ. १० वी परीक्षेसाठी राज्यातून ८६२८१ विद्यार्थी नोंदविण्यात आले. **NTS** राष्ट्रीय परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातून ३८७ विद्यार्थी कोटा एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली यांचेकडून निश्चित केला आहे. त्यामध्ये सर्वसाधरण गटातील (General) १९६, OBC संवर्गातील १०४, अनुसूचित जाती (SC) ५८ व अनुसूचित जमाती (ST) २९ अशा एकूण ३८७ विद्यार्थ्यांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच संबंधित संवर्गात अपंगासाठीचे ४% आरक्षण समाविष्ट आहे. ज्या विद्यार्थ्यांची निवड जात/अपंगत्व आरक्षणातून झालेली आहे त्यांनी सदरचे प्रमाणपत्राची सत्यप्रत प्रवेशपत्रासोबत एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली यांना सादर केल्याशिवाय त्यांची निवड कायम समजण्यात येणार नाही. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची **राष्ट्रीयस्तर परीक्षा रविवार दिनांक १२ मे २०१९ रोजी होणार आहे.** संबंधित निवड यादीतील विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे एप्रिल २०१९ च्या पहिल्या/दुसऱ्या आठवडयात NCERT नवी दिल्ली यांच्या www.ncert.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. ही निवडयादी **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in वेबसाईटवर शुक्रवार दिनांक ०१/०३/२०१९ रोजी सायं. ५.०० वाजल्यापासून पाहता येईल.**

गतवर्षी महाराष्ट्रातून सदर परीक्षेत राष्ट्रीयस्तरावरील १००० पैकी ९२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झालेली आहे ही अभिमानास्पद बाब आहे.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -१**

**दि. ०१.०३.२०१९**